Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2017
SPECIAL ISSUE-XV

# २००० नंतरच्या साहित्यातील समाजचित्रण

Guest Editor -
Dr. P. V. Rasal
Coordinator-Dean - Mental Moral and Social Sciences,
Savitribai Phule Pune University, Pune [M.S.] India
Principal - KGDM Arts, Commerce & Science College,
Niphad, Dist – Nashik [M.S.] INDIA

Chief Editor –
Prof. Dhanraj Dhangar
Asst. Prof.(Deptt. of Marathi)
M.G.V.'S Arts & Commerce College,
Yela, Dist – Nashik
[M.S.] INDIA

Executive Editor : Prof. Smt. Sunita Uphade (Niphad),
Associate Editors : Prof. Madhav Khalkar & Prof. R. D. Shinde (Niphad)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

Price : Rs. 225/-

© All rights reserved with the authors & publisher

अनुक्रमणिका


| अ. नं. | शोधनिबंधाचे शीर्षक - लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय - <br> - प्रा. श्रीमती सुनीता उफाडे | ०४ |
| २ | मराठी विज्ञान कादंबरीतील सामाजिकता <br> -डॉ. पौर्णिमा बोडके | ०५ |
| ३ | २००० नंतरचे मराठी साहित्य आणि समाज <br> - प्रा. डॉ. भाऊसाहेब वि. गमे | ०८ |
| ४ | २००० नंतरच्या नागरी जाणिवांचा रोखठोक आविष्कार 'शहर आत्महत्या करायच म्हणतंय' <br> -डॉ. राहूल पाटील | १२ |
| ५ | 'भिन्न' (२००७) कादंबरीतील भाषाशैली <br> -डॉ. किरण पिंगळे | २० |
| ६ | ग्रामीण कथेतील बदलते समाजजीवन <br> -डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर | २४ |
| ७ | आसाराम लोमटेच्या कथेतील सामाजिक प्रश्न आणि वर्तमानातील बदलते संदर्भ <br> - डॉ. अशोक देशमाने व डॉ. मनोज मुनेश्वर | २७ |
| ८ | २००० नंतरची मराठी कविता : एक वेध <br> - प्रा. महेश बनकर | ३१ |
| ९ | २००० नंतरच्या मराठी कादंबरीतील सामाजिक स्थित्यंतरे <br> - प्रा. कैलास सलादे | ३४ |
| १० | २००० नंतरचे मानवी व कृषिजीवनातील स्थित्यंतरे <br> - प्रा. अशोक भवर | ३७ |
| ११ | २००० नंतरचे मराठी साहित्य <br> - प्रा. शिवाजी सुंभे | ४१ |
| १२ | २००० नंतरचे मराठी साहित्यातील एक प्रवाह -भाषांतरीत साहित्य <br> - प्रा. देविदास शिंदे | ४४ |
| १३ | २००० नंतरच्या स्त्री साहित्याचे सामाजिकीकरण <br> - प्रा. माधुरी गवळी | ४७ |
| १४ | तेंडुलकरांच्या नाटकांचा २००० सालानंतरच्या नाटकांवर होणारा प्रभाव <br> - श्रीमती विजया पाटील | ५० |
| १५ | २००० नंतरच्या मराठी नाटकांवर जागतिकीकरणाचा प्रभाव <br> प्रा. नारायण पाटील | ५३ |
| १६ | २००० नंतरच्या चरित्र व आत्मचरित्राचे स्वरुप <br> - श्रीमती मंजुषा सोनार | ५६ |
| १७ | समकालीन कवयित्रींच्या कवितांतील स्त्री समस्यांचे चित्रण <br> - प्रा. अरूण ठोके | ५९ |
| १८ | २००० नंतरच्या स्त्री साहित्यातील समाज चित्रण <br> -प्रा. श्रीमती सुनीता उफाडे | ६२ |
| १९ | २००० नंतरच्या मराठी साहित्यातील पर्यावरण चित्रण <br> -प्रा. आर. डी. शिंदे. | ६५ |


RESEARCHJOURNEY

या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 15 : २००० नंतरच्या साहित्यातील समाजचित्रण
ISSN : 2348-7143
February 2017

# २००० नंतरच्या मराठी कादंबरीतील सामाजिक स्थित्यंतरे

**प्रा.कैलास सलादे,**
**कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**
**ओझर मिग,ता. निफाड,जि. नासिक.**

मराठी कादंबरी हा साहित्य प्रकार प्रारंभापासून अनेक वाटा-वळणे घेत विकसित होत गेला आहे.प्रत्येक काळाचे सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न तिने प्रभावीपणे मांडले आहे.समाजव्यवस्थेची घडी कधीच स्थिर आणि एकपदरी नसते.तिच्यात नेहमीच स्थित्यंतरे होत असतात.सामाजिक स्थित्यंतराबरोबर कादंबरीचे आशयविश्व बदलत असते.1960 नंतर मात्र समाजजीवनामध्ये विविधांगी सर्व पातळयांवर स्थित्यंतरे जाणवू लागली होती.या स्थित्यंराचे प्रतिबिंब या काळतील कादंबरीत प्रतिबिंबीत झालेले दिसते.मात्र 2000 नंतरच्या काळाचा विचार करता 1960 ते 2000 पर्यंतचा काळ हा काहीसा स्थिर आणि फारसा भयावह नव्हता असे म्हणता येईल.म्हणजे 2000 पूर्वीच्या काळात समाजजीवनात कोणते बदल,ताण-तणाव,संघर्ष जाणवत नव्हते असे म्हणता येणार नाही.फक्त या काळातील सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराची गती मात्र अती तीव्र नव्हती एवढेच.

2000 नंतरचे पहिले आणि दुसरे दशक मात्र अनेक सामाजिक प्रश्न घेऊन आलेले दिसते. समाजजीवनात प्रचंड उलथा पालथ घडविणारे ठरले आहे.अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न या काळात धारधार आणि टोकाचे बनले दिसतात.भाषेच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा प्रश्न,धर्म,जात-वर्ग व प्रदेशाचे प्रश्न, वाढती गुन्हेगारी,भोगवादी- चंगळवादीवृत्ती,पर्यावरणाचे प्रश्न,सायबर क्राईम,शेतक-याच्या वाढत्या आत्महत्या,नपुंसक शिक्षण व्यवस्थेचा दिखाऊपणा,राजकारण्यांची स्वार्थी व भ्रष्टाचारी प्रवृत्ती,आरक्षणांच्या मागणीसाठी निघालेले विविध मोर्चे,धर्मा-धर्मात वाढणारी तेढ,असहिष्णूतेचा प्रश्न,कोपर्डी निर्भयासारखी दूर्दैवी घटना त्यातून पुढे आलेला स्त्रियांच्यावरील अत्याचाराचा व सुरक्षितेचा प्रश्न,विस्थापित बांधवांचा वाढता आक्रोश,दहशतवाद,नक्षलवाद,वाढती भांडवलशाहीवृत्ती 'सेझ' सारख्या परदेशी कंपन्यांनी निर्माण केलेला भूमीपुत्रांच्या अस्तित्वाचा प्रश्न,आस्मानी सुलतानी संकट परंपरा,बहुराष्ट्रीय कंपन्यानी निर्माण केलेली शोषण परंपरा समाजजीवनात प्रचंड ढवळा-ढवळ करुन गेली.या ढवळा ढवळीचे पडसाद 2000 नंतरच्या कादंबरीत पडलेले दिसतात.

2000 नंतरच्या मराठी कादंबरीत नवे प्रश्न,नवे ताण-तणाव,संघर्ष,बदलत्या सामाजिक जाणिवा,आर्थिक-सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे टिपली गेली.समाजजीवनातील अनेक महत्वाचे प्रश्न,समस्या,अनुभवविश्व वेगवेगळया पातळयांवरुन कादंबरीत आलेले दिसते. 'वळूवनातील कामधेनू' (2001) या राजन खान यांच्या कादंबरीने नोकरी करणारी व पुरुषी व्यवस्थेत कामधेनू ठरलेल्या एका स्त्रीचे मनोविश्व मांडले आहे. 'धूळपेरणी' (2001) यातून 'शेषराव मोहिते' यांनी कृषिविद्यालयात शेतीशास्त्राचे घेतलेले ज्ञान व्यवहारी जगात कसे कुचकामी ठरते.त्यामुळे शेतीतून बाहेर पडू बघणा-या तरुणांच्या मानसिक कोलाहालाचा वेध घेतला आहे. 'एसे कुणबी भूपाळ' (2001)या भारत काळे यांच्या कादंबरीत एकत्र कुंटूब व्यवस्थेच्या सांस्कृतिक,सामाजिक,आर्थिक –हासपर्वाची कहाणी सांगितली आहे.बदलते ग्रामवस्तव आणि ढासळती कुंटूब

व्यवस्था त्यांनी कादंबरीत टिपली आहे. 'सेलझाडा' (2001) मध्ये नामदेव कांबळे यांनी बदलत्या वर्तमानात कालबाह्य जीवनमूल्यांना जपणा-या पारंपारिक बलुतेदाराच्या सामाजिक अवस्थेचा आढावा घेतला आहे.

सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास'(2002) या कादंबरीतून अस्मानी-सुलतानी संकट परंपरांच्या तावडीत सापडून –हासपर्वाकडे वाटचाल करणा-या संबंध कृषिव्यवस्थेचा घेतलेला आढावा अस्वस्थ करणारा आहे.हरितक्रांतीचे गोड-आंबट अनुभव चाखलेल्या शेतक-याला जागतिकीकरणामूळे किती मोठ्या शोषणाला व स्थित्यंतराला सामोरे जावे लागले ते तपशिलासह कादंबरीत मांडले आहे.शेतीच्या –हासपर्वासोबत भ्रष्ट शिक्षणव्यवस्था,स्वार्थी राजकारण,चंगळवादीवृत्ती आणि बदलत्या नाते संबंधाच्या पैलूंना टिपण्याचा प्रयत्न सामाजिक दृष्टिकोनातून महत्वाचा ठरतो. 'गाथा सप्तपदी' (2002) या राजेंद्र मलोसे यांनी विवाहसंस्था स्त्रीच्या शोषणाला कशी जबाबदार ठरते याचा विचार केला आहे. 'कौहम' (2002) या सुरेश व्दादशीवर यांच्या कादंबरीत धर्म व्यवस्थेच्या आडून सत्तेची पोळी भाजून घेणा-या धूर्त राजकिय व्यवस्थेचा पर्दापाश केला आहे. गुरुनाथ नाईक यांच्या 'इस्लामी ड्रॅगन' (2004) या कादंबरीत दहशतवादाने बदलवून आणि हादरवून टाकलेले समाजजीवन मांडले आहे.वाढत जाणारा मुलत्ववाद आणि सामाजिक प्रश्न या कादंबरीत हाताळले आहे. लक्ष्मण गायकवाडांच्या 'दुभंग'(2005) कादंबरीने नैसर्गिक आपत्तीत माणूसकी हरवलेल्या स्वार्थ समाजप्रवृत्तीचा वेध घेतला आहे.

'नताचरामि' या मेघना पेठे यांच्या कादंबरीत घ टस्फोटीत स्त्रियांचा प्रश्न स्त्री मुक्तीचळवळीच्या दृष्टीने मांडण्याचा प्रयत्न दिसतो.बदलत्या सामाजिक,सांस्कृतिक स्थित्यंतराने स्त्रीयांच्या जगण्यात किती गंभीर प्रश्न उगवून येतात हे या कादंबरीचे आशयसूत्रे आहेत.कविता महाजन यांची 'ब्र' (2005) ही कादंबरी पुरुषी संस्कृती विरुद्ध बंड करून स्त्रीचा शोध घेणा-या एका स्त्रीचा प्रवास यात मांडला आहे.स्त्री ही व्यवस्थेची गुलाम कशी होत गेली.हे गुलामीचे बंध झुगारुन दिल्याने कोणते सामाजिक पडसाद पडले हे अचूक टिपले आहे.

प्रा.शंकर सखाराम यांची 2007 मध्ये प्रसिध्द झालेली 'सेझ' या कादंबरीने वसाहतवादी मनूवृत्तीचा शोषणोत्सूक चेहरा 'सेझ'च्या रुपाने मांडला आहे.विशेष आर्थिक क्षेत्रा (सेझ) मुळे इथल्या आदिम वर्ग समूहाच्या जीवनव्यवस्थेत किती तीव्र स्थित्यंतरे घडली याची नोंद ही कादंबरी घेते. 'रौंदळा' (2008) या कृष्णात खोतांच्या कादंबरीने विकृत राजकारणाने स्थिर ग्रामव्यवस्थेत सांस्कृतिक आणि सामजिक प्रश्न उपस्थित करून मुळच्या सहानुभाववादी ग्रामव्यवस्थेत घडवून आणलेला रौंदळा मोठे सामाजिक स्थित्यंतर आधोरेखित करतो.प्रवीण दशरथ बांदेकर यांच्या 'चाळेगत'(2009) या प्रयोगशील कादंबरीने कोकण प्रदेशातील 'भूईजड' झालेल्या तरुण पिढीची शोकांतिका अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न उपस्थित करते. 'हिंदू-जगण्याची समृध्द अडगळ' (2010) या भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीत कृषिसंस्कृतीच्या पराभावाची कथा कृषिव्यवस्थेतील अनेक स्थित्यंतरांना स्पर्श करते. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' (2011) या आनंद विंगकर यांच्या कादंबरीने जागतिकीरणाच्या पार्शभूमीवर शोषणव्यवस्थेच्या अग्रस्थानी सापडलेल्या अल्पभूधारक शेतक-यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आणि त्यांचे धोक्यात आलेले सामाजिक स्थान कादंबरीत मांडलेले आहे. 'ब बळीचा' (2012)या प्रयोगशील कादंबरीत भोगवादी भ्रष्ट समाज व्यवस्थेत कृषिजन संस्कृतीचे प्रश्न विविध पातळयांवरुन हाताळून इथल्या कृषिवलांच्या सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतरांचा वेध 'राजन गवस' यांनी घेतला आहे. 'जोहार'(2015) या अलिकडे प्रसिध्द झालेल्या आणि चर्चा

ISSN : 2348-7143
February 2017

विषय ठरलेल्या कादंबरीत नपुंसक शिक्षणव्यवस्था,बदलते ग्रामजीवन,भ्रष्ट प्रसारमाध्यमे ,परात्म झालेली तरुण पिढी ह्या संबंध व्यवस्थेचा कैनव्हास जोहारमध्ये चितारला आहे.

2000 नंतरच्या मराठी कादंबरीने समाज,संस्कृती,राजकारण,अर्थ ,भाषा,धर्म आणि मूल्य या घटकांच्या अनुषंगाने अनेक प्रश्न मांडलेले दिसतात.2000 नंतरच्या काळात लिहल्या जाणा-या कादंब-यांची संख्या लक्षणिय आहेत.इथे विवेचनेसाठी मोजक्याच कादंब-यांचा विचार केलेला आहे.या काळात झपाट्याने बदलणारे समाजजीवन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये विविध प्रश्न ,ताण-तणाव,संघर्ष,क्रीया-प्रतिक्रीया टिपताना कादंबरीकाराची कसरत लागते.2000 च्या मराठी कादंबरीने ही सामाजिक स्थित्यंतरे सूक्ष्म निरिक्षणासह टिपली आहे.या काळातील कादंबरीचे महत्वाचे विशेष मानावे लागतील.

_______***_______

RESEARCHJOURNEY